- साठवण तलावातुन मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होऊन साठवलेले पाणी कमी होत असते. आवश्यकता असल्यास बाष्पीभवन कमी करण्यासाठी उपलब्ध पद्धतींचा वापर करता येऊ शकेल. परंतु, त्यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता खराब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
- साठवून ठेवलेल्या पाण्याची उपविभागीय प्रयोगशाळेमार्फत नियमित पाणी गुणवत्ता चाचणी करण्यात यावी.

**शासन परिपत्रक क्रमांक ग्रापाधो-२०२१/प्र.क्र.१७/पापु-०७, दिनांक २० ऑगस्ट, २०२१ सोबतचे परिशिष्ट**

# परिशिष्ट-२

## फेरोसिमेंटच्या छोट्या टाक्या (पागोळी विहीर)


पर्जन्यमान मोठ्या प्रमाणावर असुनही भुरचना व भुस्तरीय परिस्थिती प्रतिकुल असल्याने उन्हाळ्यात अनेक गावे, वाड्या-वस्त्यांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवते. भुस्तरीय रचनेमुळे भूजल पुनर्भरण करुन सुद्धा उन्हाळ्यापर्यंत पाणी टिकून रहात नाही अथवा जमिनीखालचे पाणी खारे असल्यामुळे त्याचा फायदा होत नाही. अशा गावे, वाड्या, वस्त्यांमध्ये पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे घराच्या छतावर पडणाऱ्या पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी फेरोसिमेंटच्या छोट्या टाक्या अथवा पागोळी विहिर बांधून अशा वाड्यांची पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यात यावी. अशा योजना शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत हाती घेण्यात आल्या आहेत.


अत्यंत कमी लोकसंख्या असलेल्या गावे, वाड्या-वस्त्यांकरिता या योजना हाती घेण्यात याव्यात. वाडीतील सर्व घरांकरिता पाऊस पाणी संकलन व्यवस्था करण्यात यावी. पाऊस पाणी संकलन व्यवस्थेमध्ये छताच्या खालच्या निमुळत्या टोकाशी पाणी एकत्रित करण्याकरिता नळी बसविण्यात यावी. नळीचा साधारण उतार जमिनीवरील साठवण टाकीत सोडलेल्या उभ्या नळीकडे देण्यात यावा. नळीच्या खालच्या टोकास मेश तारेची जाळी लावण्यात यावी जेणेकरुन झाडाची वाळलेली पाने व इतर अनावश्यक वस्तू साठवण टाकीत जाण्यापासून प्रतिबंध करता येईल. पहिल्या पावसाच्या पाण्यासोबत येणारी धुळ व इतर कचरा इत्यादी टाकीत जाऊ न देता बाजुला सोडण्यात यावा. आवश्यक तेवढे पावसाचे पाणी साठवण्यात यावे व टाकी भरल्यावर अतिरिक्त पाणी जमिनीत मुरवावे अथवा नदी नाल्यात सोडण्यात यावे.


साठवण टाकी जमिनीवर अथवा जमिनीखाली बांधता येईल. कमी खर्चाच्या व टिकाऊ म्हणून फेरोसिमेंटच्या टाक्या बांधण्यात याव्यात. वाडीतील घरे किती विखुरलेली आहेत त्या आधारे सर्व घरांसाठी एकत्रित अथवा वेगवेगळ्या टाक्या बांधण्यात याव्यात. टाकी बांधण्याकरिता फेरोसिमेंट अथवा चिकन मेशचा वापर करुन त्यावर सिमेंट व रेतीचा गिलावा करण्यात यावा. मोठ्या आकाराच्या टाक्यांसाठी लोखंडी सळ्यांचा सांगाडा वापरण्यात यावा. टाकीचा आकार उपलब्ध करुन द्यावयाच्या पाण्याच्या क्षमतेनुसार निश्चित करण्यात यावा. पाणी निर्जंतुक राहण्यासाठी विरंजक चुर्ण वापरण्यात यावे. जमिनीवरील टाकी करिता सुमारे ३.५० ते ४ रु. प्रती लिटर इतका व जमिनीखालील टाकीस अंदाजे २ ते ३ रु प्रती लिटर इतका खर्च अपेक्षित आहे.

अशा प्रस्तावित गावांमध्ये या योजना योग्यरित्या वापरण्याकरिता व योजनेच्या देखभाल दुरुस्तीकरिता ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर क्षमता बांधणी करण्यात यावी. योजना तयार करताना सविस्तर सर्वेक्षण करुन पाऊस पाणी संकलन व्यवस्था, साठवण टाक्या इत्यादीचे अचुक आकारमान घेऊन अंदाजपत्रके तयार करण्यात यावीत व संपुर्ण गाव / वाडी-वस्ती करिता एकत्रित निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

## संकल्प चित्र -





Tank Under construction


completed Tank


**शासन परिपत्रक क्रमांक ग्रापाधो-२०२१/प्र.क्र.१७/पापु-०७, दिनांक २० ऑगस्ट, २०२१ सोबतचे परिशिष्ट**

# परिशिष्ट-३
# भूमीगत साठवण टाकी

ज्या ठिकाणी जागेची उपलब्धता कमी आहे अथवा इतर बाबींमुळे जमिनीवर साठवण टाकी बांधणे शक्य नाही किंवा सदर गावे, वाड्या-वस्त्यांकरिता उपयुक्त आहे अशा ठिकाणी भूमीगत साठवण टाकी योजना हाती घेण्यात यावी.

परिशिष्ट-२ (फेरोसिमेंटच्या छोट्या साठवण टाक्या) मध्ये विवेचन केलेल्या सर्व बाबी भूमीगत साठवण टाकी साठी लागू राहतील. सदर परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे भूमीगत साठवण टाकीसाठी देखील छतावरील पाऊस पाणी संकलन व्यवस्था निर्माण करण्यात यावी. भूमीगत साठवण टाकीचे बांधकाम देखील फेरोसिमेंट पद्धतीने करण्यात यावे. टाकीचा आकार उपलब्ध करुन द्यावयाच्या पाण्याच्या क्षमतेनुसार निश्चित करण्यात यावा. पाणी निर्जंतुक राहण्यासाठी विरंजक चुर्ण वापरण्यात यावे. टाकी धसु नये या करिता आवश्यक ती काळजी घेण्यात यावी.

अशा प्रस्तावित गावांमध्ये या योजना योग्यरित्या वापरण्याकरिता व योजनेच्या देखभाल दुरुस्तीकरिता ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर क्षमता बांधणी करण्यात यावी. योजना तयार करताना सविस्तर सर्वेक्षण करुन पाऊस पाणी संकलन व्यवस्था, साठवण टाक्या इत्यादीचे अचुक आकारमान घेऊन अंदाजपत्रके तयार करण्यात यावीत व संपुर्ण गाव / वाडी-वस्ती करिता एकत्रित निविदा प्रक्रिया करण्यात यावी.






पृष्ठ १० पैकी १०

**जल जीवन मिशन अंतर्गत योजना अंमलबजावणी स्थळी प्रदर्शनी फलक लावणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जजीमि २०२१/प्र.क्र.१४०/पापु १०**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅाफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: २६ ऑगस्ट, २०२१

वाचा-

**शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि-२०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १० (०७), दि.०४.०९.२०२०**

प्रस्तावना-

राज्यात सन २०१९ पासून जल जीवन मिशन राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाने दि.२५.१२.२०१९ रोजी जल जीवन मिशनच्या कार्यरत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्याआधारे राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरीता संदर्भिय शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

जल जीवन मिशनच्या यशस्वी अंमलबजावणीकरीता जल जीवन मिशन ही एक लोकचळवळ होणे अभिप्रेत आहे. जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या सुयोग्य परिचालन व दिर्घकालीन सुरक्षेकरीता स्थानिक समूहांनी आणि ग्राम पंचायत/ ग्राम पाणी व स्वच्छता समितीने पुढकार घेऊन योजनेचे नियोजन, व्यवस्थापन आणि अंमलबजावणीची जबाबदारी घेणे आवश्यक आहे. जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या माध्यमातुन निर्माण होणा-या साधन संपत्तीबाबत लोकांमध्ये मालकीची भावना निर्माण झाल्यास जल जीवन मिशन लोकचळवळ होण्यास मदत होणार आहे. जल जीवन मिशन अंमलबजावणीमध्ये ग्राम पंचायतींची नेमकी भूमिका लक्षात यावी याकरीता केंद्र शासनाने दि.२९.०९.२०२० अन्वये ग्रामपंचायतींकरीता मार्गदर्शिका प्रसिध्द केली आहे. सदर मार्गदर्शिकेतील परिच्छेद ४.२४ नुसार जल जीवन मिशन अंतर्गत माहिती, शिक्षण व संवाद घटकांतर्गत योजना अंमलबजावणी स्थळी दर्शनी/ मोक्याच्या जागेवर योजनेबाबतच्या माहितीविषयक प्रदर्शनी फलक लावणेबाबत तरतूद आहे. त्याअनुषंगाने सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक-

जल जीवन मिशन अंतर्गत स्थानिक सहभागाद्वारे योजना प्रक्रियेत पारदर्शकता आणता यावी याकरीता योजनेबाबतची आवश्यक माहिती स्थानिक ग्रामस्थ/ लोक समूह/ संस्था यांना माहिती असणे आवश्यक आहे. याद्दष्टीने खालील सूचना देण्यात येत आहेत.

१. जल जीवन मिशन अंतर्गत पुर्ण झालेल्या योजना व प्रगती पथावरील योजना अंमलबजावणी स्थळी योजनेच्या सर्वसाधरण माहितीबाबत ८` X ६` आकाराचा प्रदर्शन फलक दर्शनी स्थळावर लावण्यात यावा.

२. सदर मोक्याच्या जागेवरील दर्शनी फलकावर जल जीवन मिशन मार्गदर्शिकेतील परिशिष्ट-८ मध्ये नमुद बाबींचा समावेश करण्यात यावा. (शासन परिपत्रकासोबतचे परिशिष्ट क्र.१ पहावे.) दर्शनी फलकावर संबंधित कार्यकारी अभियंता/ उप अभियंता/ शाखा अभियंता, ग्राम पाणी व स्वच्छता समितीचे अध्यक्ष, ग्रामसेवक यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक स्पष्टपणे नमुद करण्यात यावे.

३. जल जीवन मिशन अंतर्गत कार्यारंभ आदेश दिलेल्या सर्व योजनांच्या अंमलबजावणीस्थळी या परिपत्रकाच्या दिनांकापासून पुढील एक महिन्याच्या आत प्रदर्शन फलक लावण्यात यावेत. याबाबतची कार्यवाही अंमलबजावणी सहाय्य संस्था/ अन्य उपलब्ध मनुष्यबळाच्या सहाय्याने पुर्ण करण्यात यावी. याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्याकरीता संबंधित शाखा अभियंता सर्वस्वी जबाबदार राहतील.

४. याबाबतचा खर्च माहिती, शिक्षण व संवाद (IEC) घटकांतर्गत जल जीवन मिशन सहाय्य निधीकरीता उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०८२६०९५३२७६१२८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2021.08.26 13:04:36 +05'30'

(सरोज देशपांडे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री ( पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय, मुंबई
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
५. मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
६. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. सह सचिव/विशेष कार्य अधिकारी/उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रकल्प संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई
१०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११. निवडनस्ती (कार्यासन -पापु १०)

**शासन परिपत्रक क्र. जजीमि २०२१/ प्र.क्र.१४०/ पापु १०, दि.२६.०८.२०२१ सोबतचे परिशिष्ट -१**

## जल जीवन मिशन लोगो (१'५" X२") सहीत प्रदर्शनी फलक नमुना (८'X६')

Har Ghar Jal
Jal Jeevan Mission

# जल जीवन मिशन

सत्यमेव जयते

## "हर घर जल"

गावाचे नाव............तालुका.........जिल्हा..........राज्य..........

- पाणी पाणी पुरवठा योजनेचे नाव.......... एकुण किंमत........
- ग्राम सभेतील मंजुरी दिनांक.......
- केंद्र हिस्सा निधी रु............ राज्य हिस्सा निधी रु.......... लोक वर्गणी रु.......... रोखीने
- तांत्रिक मान्यतेचा दिनांक..............कार्यारंभ आदेशाचा दिनांक.............
- योजना पुर्ण होण्याचा दिनांक.............
- अंमलबजावणी यंत्रणा................
- अंमलबजावणी सहाय्य संस्था............

| कामातील घटक | किंमत | मुख्य कामातील घटक | किंमत | संख्या |
|---|---|---|---|---|
| स्त्रोत पुनर्भरण योजना | | बोअर/ स्त्रोताचे बोअर विषयक काम | | |
| पाणी पुरवठा योजना | | उर्ध्व/ वितरण वाहिनी | | |
| मलनिस्सारण व्यवस्था | | शुध्दीकरण/ ESR | | |
| देखभाल दुरुस्ती | | मापन/ मूल्यमापन | | |

- योजनेशी संबंधित महत्वाच्या व्यक्तींचे नाव व संपर्क क्रमांक
  १. सरपंच /अध्यक्ष ग्राम पाणी व स्वच्छता समिती ...........
  २. ग्रामसेवक ..........
  ३. शाखा अभियंता/ उप अभियंता......
  ४. कंत्राटदार..........

**जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या तांत्रिक/ प्रशासकीय/ अंमलबजावणी अधिकारांबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जजमि- २०२० /प्र.क्र. १३८ /पापु १०**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅाफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: २२ सप्टेंबर, २०२१

वाचा-

१) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि २०२०/प्र.क्र.१३८/ पापु १० (०७), दि.०४.०९.२०२०**
२) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि २०२०/प्र.क्र.१३८/ पापु १० (०७), दि.१०.०३. २०२१**
३) **केंद्र शासनाच्या National Jal Jeevan Mission यांचे पत्र दि.W- ११०११/२०/२०२१-JJM-DDWS दि. १४.०८.२०२१**

प्रस्तावना-

जलजीवन मिशनचा सन २०२१-२२ हा आराखडा निश्चित करण्यात आला असून वार्षिक कृती आराखडा २०२१ यामध्ये एकूण २९,८४८ योजना समाविष्ट आहेत. राज्यात एवढ्या मोठ्या प्रमाणावरील योजनांच्या अंमलबजावणीसाठी सर्व अनुषंगिक बाबी पुर्ण करणे म्हणजे त्याला तांत्रिक मान्यता देणे, प्रशासकीय मान्यता देणे, निविदा प्रक्रिया करणे हे अत्यंत गतीने होणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या दिनांक १४ ऑगस्ट २०२१ च्या निर्देशानुसार दिनांक ३१ डिसेंबर २०२१ पूर्वी सर्व प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचे कार्यादेश देण्यापर्यंतची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. सबब एवढ्या प्रचंड मोठ्या प्रमाणावर विविध योजनांच्या तांत्रिक मान्यतेचे सुसुत्रीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

## शासन निर्णय-

१) शासन निर्णय दिनांक १०.०३.२०२१ मध्ये परिच्छेद क्र. (Vii) नुसार रु.३०.०० कोटी पेक्षा अधिक किंमतीच्या योजनांची छाननी करण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पाणी व स्वच्छता मिशनची तांत्रिक छाननीसाठी समिति

गठीत करण्यात आली आहे. तथापि केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन विषयक मार्गदर्शक सूचनांनुसार (राज्यस्तरीय योजना मंजुरी समिती) State level Scheme Sanctioning Committee (SLSSC) गठीत करण्यात आलेली आहे. यामध्ये केंद्र शासनाचे विविध प्रतिनिधी असून सदर समिती ही अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली असून योजनांच्या तांत्रिक बाबींवर संपूर्ण विचार करते. सबब द्विरूक्ती टाळण्यासाठी शासन निर्णय दिनांक १०.०३.२०२१ परिच्छेद क्र. (Vii) मधील अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या स्तरावरील समिती पूर्णतः रद्द करण्यात येत आहे. या ऐवजी राज्यस्तरीय योजना मंजुरी समिती (SLSSC) योजनांना मान्यता देईल.

२) शासन निर्णय दि.१०.०३.२०२१ च्या परिच्छेद क्र. (VI) मध्ये रु.५.०० कोटी ते रु.३०.०० कोटी पर्यंतच्या योजनांची छाननी करण्यासाठी मिशन संचालक, जल जीवन मिशन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पाणी व स्वच्छता मिशनची उप समिती आहे. तथापि सदस्य सचिव (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ) यांच्याकडे सर्व तांत्रिक यंत्रणा उपलब्ध आहेत. या तांत्रिक बाबीचा विचार करता मिशन संचालक यांच्या अध्यक्षतेखालील समिती ऐवजी ही समिती आता सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे असेल. ही समिती रु. ५.०० कोटी वरील सर्व योजनांची तांत्रिक छाननी करेल.

१) अध्यक्ष - सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.

२) सदस्य - मिशन संचालक (जल जीवन मिशन ), राज्य पाणी व स्वच्छता मिशन

३) सदस्य -मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

४) सदस्य - प्रकल्प संचालक (वित्त), जल जीवन मिशन,राज्य पाणी व स्वच्छता मिशन

५) सदस्य - कार्यकारी अभियंता, राज्य पाणी व स्वच्छता मिशन

६) सदस्य - उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (संबंधित प्रादेशिक विभाग

७) सदस्य सचिव – अधिक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०९२२१४५९३१८६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Kundlik Puri

Digitally signed by Pravin Kundlik Puri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=deec47ad25fc7d88d8920ac82eeb80566d6602e538e92d0aa7206eb36e7aa29c, cn=Pravin Kundlik Puri
Date: 2021.09.22 18:13:29 +05'30'

**(प्रवीण पुरी)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधीमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधीमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. मा.अपर मुख्य सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई.
११. मिशन संचालक, जल जीवन मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन), बेलापूर, नवी मुंबई.
१२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१३. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१५. उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. मुख्य अभियंता/ अधिक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

१७.प्रकल्प संचालक, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद (सर्व)
१८.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१९.निवडनस्ती -कार्यासन- पापु १०

**जल जीवन मिशन अंतर्गत घरगुती नळ जोडणीच्या कार्यात्मकतेबाबत (Functionality)**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जेजेएम २०२०/प्र.क्र. ११५/पापु १०**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅाफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: २० ऑक्टोबर, २०२१

**वाचा-**

१. **केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन विषयक मार्गदर्शक सुचना दि. २५.१२.२०१९**
२. **शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजीमि ०६२०/ प्र.क्र.२०/ पापु ०७, दि.०३.०८.२०२०**
३. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि-२०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १०(०७),दि.०४.०९.२०२०**

**प्रस्तावना**

जल जीवन मिशन अंतर्गत घरगुती नळ जोडणी देणेबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना व शासन निर्णय संदर्भ क्र. २ व ३ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. ग्रामीण भागातील कुटुंबांना, शाश्वत व शुध्द पेयजल घरगुती नळ जोडणीद्वारे उपलब्ध करुन देणे जल जीवन मिशनचा गाभा आहे. जल जीवन मिशन मार्गदर्शक सूचनेनुसार पिण्यायोग्य पाणी (BIS : १०५०० मानकाप्रमाणे) पुरेशा प्रमाणात (दरडोई किमान ५५ लिटर) नियमितरित्या (दररोज किंवा पाणी पुरवठा वेळापत्रकानुसार) वैयक्तिक नळ जोडणीद्वारे उपलब्ध होत असल्यास अशी वैयक्तिक नळ जोडणी कार्यात्मक (Functional) मानली जाते. उक्त निकषावर आधारित घरगुती नळ जोडणीची कार्यात्मकता केंद्र शासनामार्फत देखील सर्वेक्षणाद्वारे वेळोवेळी तपासण्यात येते.

**शासन परिपत्रक-**

शासन निर्णय संदर्भ क्र. २ च्या सुचना क्र. **"फ"** - मध्ये सदर कार्यात्मक घरगुती नळ जोडणीच्या कामांच्या (FHTC) अंदाजपत्रकांना मान्यता देतांना खालील प्रमाणे प्रमाणित करणे आवश्यक आहे.-

*" तांत्रिक मान्यतेनुसार एकुण...................... (येथे संख्या नमुद करावी) इतक्या घरांना जल जीवन मिशनच्या निकषानुसार कार्यात्मकता नळ जोडणी मिळतील. त्याचे निकषानुसार मूल्यामापन करुन घेण्यात येईल."*

**०२. सदर बाब येथे पुनः उद्धृत करण्यात येत असुन वरीलप्रमाणे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे याची सर्व सक्षम प्राधिकारी /उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद यांनी जाणिवपूर्वक नोंद घ्यावी. प्रत्येक योजनेच्या अंदाजपत्रकात सदर प्रमाणपत्र अनिवार्य आहे.**

**०३. वैयक्तिक घरगुती कार्यात्मक नळ जोडणी देताना (FHTC) पुरेशा प्रमाणात (Quantity) , विहीत गुणवत्तेचे (Quality) व नियमितपणाने (Regularity) पाणी पुरवठा करण्यात येऊन कार्यात्मकता (Functionality) साध्य होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.**

०४. यासाठी पाहणी करण्यासाठी त्रयस्थ संस्था ( शासनाच्या उन्नत योजनांतर्गत नमुद संस्था /राज्य पाणी स्वच्छता मिशनद्वारे वेळोवेळी नामनिर्देशित संस्था ) यांचा सहभाग घेण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११०१८१७१५५३३९२८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2021.10.21 13:35:34 +05'30'

**(सरोज देशपांडे)**
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री ( पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय, मुंबई
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
५. मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
६. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
७. सह सचिव/विशेष कार्य अधिकारी/उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
९. प्रकल्प संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई
१०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११. कार्यकारी अभियंता /उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद (जिल्हा परिषदेमार्फत)
१२. निवडनस्ती (कार्यासन -पापु १०)

जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत फ्लेक्झी फंड मंजुरीकरीता राज्यस्तरीय समितीचे गठण

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

**शासन निर्णय क्रमांकः जेजेएम २०२१/प्र.क्र.१४१/पापु १०**

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: २४ नोव्हेंबर,२०२१

**वाचा-**

१. **केंद्र शासनाचे** Ministry of Finance, Department of Expenditure, Plan Finance-II Division **चे आदेश क्र.** F.No. ५५ (५) PF-II/२०११, **दि.०६.०९.२०१६**
२. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि २०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १०(०७), दि.०४.०९.२०२०**
३. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.स्वभामि २०२०/ प्र.क्र.१७७/ पापु १६, दि.११.१०.२०२१**

**प्रस्तावना-**

जल जीवन मिशन बाबत केंद्र शासनाच्या कार्यरत मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात केंद्र पुरस्कृत जल जीवन मिशन राबविण्याकरीता या विभागाच्या संदर्भिय क्र.२ दि.०४.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील सर्व ग्रामीण कुटुंबांना सन २०२४ पर्यंत वैयक्तिक नळ जोडणीद्वारे शाश्वत व शुध्द पेयजल उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. जल जीवन मिशनचे राज्य व केंद्र वित्तीय आकृतीबंध १:१ आहे.

०२. जल जीवन मिशनच्या कार्यरत मार्गदर्शक सूचनेतील परिच्छेद क्र.७.१४ मध्ये Flexi fund बाबत खालीलप्रमाणे नमुद आहे.-

Flexi fund under JJM can be used to achieve the following objectives-
1. To undertake mitigation/restoration activities in case of natural calamities, or to satisfy local requirements in areas affected by internal security disturbance
2. to pilot innovation to improve efficiency States & UTs are advised to set aside 5% of the annual allocation under JJM to take care of unforeseen challenges/ issues arising out of natural calamities and internal disturbance which may be used by the state at the fag end of the financial year, if remain unutilized.

०३. तसेच केंद्र शासन पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा २ च्या अंमलबजावणीबाबत संदर्भिय क्र.३ दि.११.१०.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या

आहेत. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत सन २०२४-२०२५ पर्यंत संपुर्ण ग्रामीण महाराष्ट्र हागणदारी मुक्त अधिक (ODF Plus) घोषित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. याबाबत केंद्र शासनाने माहे जुलै २०20 मध्ये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहे.  सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये  फ्लेक्झी फंडबाबत खालीलप्रमाणे नमुद आहे-

The States Can use Flexi funds as per Ministry of Finance Guidelines issued in this regard from time to time for innovations/ technology optionsat the State level to meet the local needs and requirements within the overall objective of the scheme.

०४.  केंद्र शासनाच्या संदर्भिय क्र.१ दि.०६.०९.२०१६ रोजीच्या आदेशान्वये फ्लेक्झी फंडबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये Flexi fund  विनियोगाकरीता गठित करावयाच्या समितीबाबत खालीलप्रमाणे नमुद आहे-

The State Who want to avail of the flexi fund facility, Should constitute a State level Sanctioning Committee (SLSC) on the lines of RKVY to sanction projects or activities under the flexi fund component.

त्यानुसार विभागाच्या अधिनस्त वरील दोन्ही योजनांतर्गत फ्लेक्झी फंड मंजुरीकरीता राज्यस्तरीय समितीचे गठण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)टप्पा -२ अंतर्गत फ्लेक्झी फंड मंजुरीकरीता मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे राज्यस्तरीय समितीचे गठण करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.मुख्य सचिव | - अध्यक्ष |
| २) | प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | - सहअध्यक्ष |
| ३) | अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | - सदस्य |
| ४) | अपर मुख्य सचिव ,वित्त विभाग | - सदस्य |
| ५) | प्रधान सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग | - सदस्य |
| ६) | सचिव, ग्राम विकास विभाग | - सदस्य |
| ७) | सचिव, जल संपदा विभाग | - सदस्य |
| ८) | केंद्र शासनाचे प्रतिनिधी (पेयजल व स्वच्छता मंत्रालय,भारत सरकार) | - सदस्य |
| ९) | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | - सदस्य |
| १०) | सह सचिव, (पापु १० -जल जीवन मिशन), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | - सदस्य |
| ११) | सह सचिव / उप सचिव तथा अभियान संचालक (स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण), पा.पु.व स्व.वि.) | - सदस्य |
| १२) | मिशन संचालक (राज्य पाणी व स्वच्छता मिशन ) | - सदस्य सचिव |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१११२६१५०४१२४७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04a20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2021.11.24 11:22:52 +05'30'

(सरोज देशपांडे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

समितीमधील सर्व संबंधित.

प्रत,

१. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई
४. प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर
५. प्रकल्प संचालक (स्वच्छ भारत मिशन) (ग्रामीण) टप्पा-२, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई
६. अवर सचिव/ कक्ष अधिकारी (पापु -१६), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
७. पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती (कार्यासन पापु-१०), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

**जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणा-या ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्वीकृतीसाठी कार्यपध्दती**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जजीमि २०२१/प्र.क्र. १९३/पापु १०**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅाफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: ८ डिसेंबर, २०२१

वाचा-

1. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि-२०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १० (०७),दि.०४.०९.२०२०**
2. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजीमि २०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १०, दि.१०.०३.२०२१**
3. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजीमि २०१९/ प्र.क्र.१३८/पापु १०, दि.२२.०९.२०२१**

**प्रस्तावना**

शासनाने संदर्भ क्र.१ अन्वये राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरीता सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योजनांच्या तांत्रिक/ प्रशासकीय/अंमलबजावणीच्या अधिकारांबाबत सूचना संदर्भिय क्र.२ अन्वये निर्गमित केल्या आहेत. जल जीवन मिशन हा कालमर्यादित स्वरुपाचा कार्यक्रम असून या कार्यक्रमांतर्गत सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील सर्व कुटुंबासाठी नळ जोडणी करणे अपेक्षित असल्याने राज्यात प्रचंड मोठ्या प्रमाणावर योजना हाती घेण्यात आल्या/ येत आहेत. तथापि, हाती घेण्यात आलेल्या अनेक मोठ्या स्वरुपाच्या योजनांच्या निविदा प्रक्रिया व मान्यता प्रक्रियांमध्ये वेळ जात असल्याने योजनांच्या अंमलबजावणीत कालापव्यय होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर प्रक्रिया सुटसुटीत करुन प्रस्ताव मान्यते प्रक्रियेतील द्विरुक्ती टाळण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन परिपत्रक**

सद्यस्थितीत साधारणपणे मोठ्या रकमेच्या (रु.५ कोटी वरील) योजनांची निविदा स्वीकृती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा स्वीकृती समिती स्तरावर करण्यात येते. तथापि, या निविदाची किंमत जर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा अधिक असल्यास सदर जादा दराच्या निविदांना मान्यता मिळवण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येतात व निविदेची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सुधारित

प्रशासकीय मान्यतेसाठी पुनश्च प्रस्ताव सादर करण्यात येतात. यामध्ये ब-याचदा खूप कालापव्यय होतोच तसेच द्विरुक्तीही होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन यासंदर्भात पुढीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्तरावर निविदा स्वीकृतीसाठी मा.मंत्री महोदय (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या स्तरावरील समितीद्वारे मान्यता दिलेल्या जादा दराच्या निविदा कार्यादेश देण्यापूर्वी मान्यतेस शासनाकडे सादर करण्यात येतात. तथापि, योजनेची किंमत जर मूळ अंदाजपत्रकीय किमतीच्या पंधरा टक्केच्या मर्यादेत व चालु दरसूचीच्या किंवा त्यापेक्षा कमी दराच्या मर्यादेत असेल तर त्यापुढील कार्यवाही (कार्यरंभ आदेश, कंत्राटदारासोबत करार. इ.) तात्काळ सुरु करण्यात यावी.

२. सुधारित प्रशाकीय मान्यता मिळेपर्यंत सदर योजनेवर मूळ अंदाजपत्रकीय किंमतीच्या मर्यादेपर्यंतच खर्च केला जाईल, याची दक्षता घेण्यात यावी. सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव १ महिन्याच्या आतच शासनाकडे सादर करण्यात यावेत.

३. या व्यतिरिक्त उर्वरित प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून कारणमिमांसेसह शासनाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात यावेत. अशा योजनांकरीता शासन मान्यता प्राप्त झाल्याशिवाय योजनेबाबत पुढील कार्यवाही (कार्यरंभ आदेश, कंत्राटदारासोबत करार इ.) करण्यात येवू नये.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११२०७१३०५२२२५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2021.12.08 18:16:14 +05'30'

**(सरोज देशपांडे)**
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

**प्रत-**

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. प्रधान मुख्य सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई.

४. मिशन संचालक, जल जीवन मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन), बेलापूर, नवी मुंबई.

५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई

६. आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे

७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

८. उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई

९. कार्यकारी अभियंता / उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)

१०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद (सर्व)

११. निवडनस्ती -कार्यासन- पापु १०

**जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या संकल्पन कालावधीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जजीमि २०२०/प्र.क्र. १२३/पापु १०**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: ८ डिसेंबर, २०२१

**वाचा-**

१. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि-२०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १० (०७),दि.०४.०९.२०२०**
२. **शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जेजेएम २०२०/ प्र.क्र.१२३/ पापु ०७, दि.२२.०१.२०२१**
३. **उप सचिव, राष्ट्रीय जल जीवन मिशन यांचे पत्र क्र.W-११०११/३८/२०२०-JJM-III -DDWS, दि.०८.११.२०२१**

**शासन परिपत्रक-**

दि.२७-३०ऑक्टोबर,२०२१ दरम्यान केंद्रीय अधिका-यांच्या पथकाने राज्यातील जल जीवन मिशन अंतर्गत योजनांना भेटी देऊन राज्यातील योजनांच्या अंमलबजावणीबाबत काही महत्वाचे अभिप्राय संदर्भिय क्र.३ च्या पत्रान्वये सादर केलेले आहेत. त्यामध्ये CPHEEO (Central public health and environmental engineering organization) Manual नुसार जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या संकल्पन कालावधीबाबत ३० वर्ष संकल्पनाच्या तरतूदीचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत तत्कालीन परिस्थिती विचारात घेता स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांसाठी (Single Village Scheme) १५ वर्षे व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी (Multi Village Scheme) ३० वर्षे संकल्पन कालावधी विचारात घेऊन योजनांचे संकल्पन करण्याबाबत या विभागाचे संदर्भिय क्र.२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. अर्थात असे असले तरीही CPHEEO Manual नुसार यातील काही मालमत्तांचे (उदा.पाईप्स इ.) आयुर्मान ३०वर्षापेक्षा जास्त असते.

आता केंद्र शासनाने संदर्भित क्र.३ दिनांक ०८.११.२०२१ च्या पत्रान्वये पाणीपुरवठा योजनांचा कालावधी तीस वर्ष असावा असे नमुद केले आहे, यानुसार योजनांच्या संकल्पन कालावधीबाबत केंद्र

शासनाचे अभिप्राय व मिशन अंतर्गत योजनांच्या दिर्घकालीन शाश्वततेकरीता, राज्यातील सर्व योजनांचा संकल्पन कालावधी (ज्या योजनांची निविदा प्रसिध्द करण्यात आलेली नाही, अशा सर्व योजना) तीस वर्ष विचारात घेऊन , योजनांचे संकल्पन करण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११२०७१३०५१९३३२८असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2021.12.08 18:14:14 +05'30'

**(सरोज देशपांडे)**
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

**प्रत-**

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान मुख्य सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. मिशन संचालक, जल जीवन मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन), बेलापूर, नवी मुंबई.
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
६. आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
९. कार्यकारी अभियंता / उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद (सर्व)
११. निवडनस्ती -कार्यासन- पापु १०

**जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या**
**संकल्पन कालावधीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्रमांकः जजीमि २०२०/प्र.क्र. १२३/पापु १०**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅाफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: १४ डिसेंबर, २०२१

**वाचा-**

१. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि-२०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १० (०७),दि.०४.०९.२०२०**
२. **शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जेजेएम २०२०/ प्र.क्र.१२३/ पापु ०७, दि.२२.०१.२०२१**
३. **उप सचिव, राष्ट्रीय जल जीवन मिशन यांचे पत्र क्र.W-११०११/३८/२०२०-JJM-III -DDWS, दि.०८.११.२०२१**
४. **शासन परिपत्रक क्र.जजीमि २०२०/ प्र.क्र.१२३/ पापु१०, दि.०८.१२.२०२१**

**शासन परिपत्रक-**

शासन परिपत्रक क्रमांक जजीमि २०२०/ प्र.क्र.१२३/ पापु १० दि.०८.१२.२०२१ मधील परिच्छेद क्र.२ मधील ओळ क्र २.

" यानुसार योजनांच्या संकल्पन कालावधीबाबत केंद्र शासनाचे अभिप्राय व मिशन अंतर्गत योजनांच्या दिर्घकालीन शाश्वततेकरीता, राज्यातील सर्व योजनांचा संकल्पन कालावधी (ज्या योजनांची निविदा प्रसिध्द करण्यात आलेली नाही, अशा सर्व योजना) तीस वर्ष विचारात घेऊन, योजनांचे संकल्पन करण्यात यावे."

**ऐवजी**

"यानुसार योजनांच्या संकल्पन कालावधीबाबत केंद्र शासनाचे अभिप्राय व मिशन अंतर्गत योजनांच्या दिर्घकालीन शाश्वततेकरीता, राज्यातील सर्व योजनांचा संकल्पन कालावधी (ज्या योजनांची तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही, अशा सर्व योजना) तीस वर्ष विचारात घेऊन, योजनांचे संकल्पन करण्यात यावे." असे वाचण्यात यावे.

सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२११२१७१८२२१४३९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2021.12.20 11:12:55 +05'30'

**(सरोज देशपांडे)**
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

**प्रत-**

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. मिशन संचालक, जल जीवन मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन), बेलापूर, नवी मुंबई.
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
६. आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
९. कार्यकारी अभियंता / उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद (सर्व)
११. निवडनस्ती -कार्यासन- पापु १०

**जल जीवन मिशन अंतर्गत प्रादेशिक विभाग स्तरावरील तांत्रिक छाननी समितीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्रमांकः जेजेएम-२०२१/प्र.क्र. १४३/पापु १०**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅाफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: १९ जानेवारी,२०२२

**वाचा-**

१. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि २०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १०(०७),दि.०४.०९.२०२०**
२. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.राग्रापे २०१८/ प्र.क्र.४०/ पापु १०,दि.०२.०२.२०२१**
३. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजीमि-२०१९/ प्र.क्र.१३८/पापु-१०, दिनांक १०.०३.२०२१.**
४. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. जेजेएम २०२१/ प्र.क्र.१४३/ पापु १०, दि.०६.०९.२०२१**
५. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजीमि-२०१९/ प्र.क्र.१३८/पापु-१०, दिनांक २२.०९.२०२१**

**प्रस्तावना-**

जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा/प्रादेशिक स्तरावरील नवीन योजना व अस्तित्वातील योजनांच्या सुधारणात्मक पुनर्जोडणीच्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी करावयाच्या तांत्रिक छाननीकरीता संदर्भिय क्र.२ दि.०२.०२.२०२१ व संदर्भिय क्र.४ दि.०६.०९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये तांत्रिक छाननी समिती गठित केली आहे. या निर्णयामध्ये सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन शुध्दिपत्रक-**

जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा/प्रादेशिक स्तरावरील नवीन योजना व अस्तित्वातील योजनांच्या सुधारणात्मक पुनर्जोडणीच्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी करावयाच्या तांत्रिक छाननीस सक्षम समिती पुढील प्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | सक्षम समिती | |
|---|---|---|
| १ | १. कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु., जि.प. - अध्यक्ष<br>२. कनिष्ठ भूवैज्ञानिक, जि.प. - सदस्य<br>३. उप अभियंता संबंधित उप विभाग- सदस्य सचिव | रु.२.०० कोटी पर्यंत |
| २ | १. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ - अध्यक्ष<br>२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद - सदस्य<br>३. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण- सदस्य<br>४. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा - सदस्य<br>५. सहाय्यक अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ - सदस्य सचिव | रु.२.०० कोटी ते रु.३.५० कोटी पर्यंत |
| ३ | १. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संबंधित प्रादेशिक विभाग - अध्यक्ष<br>२. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ - सदस्य<br>३. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - सदस्य<br>४. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद - सदस्य<br>५. प्रकल्प संचालक, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन - सदस्य<br>६. सहाय्यक भूवैज्ञानिक - संबंधित प्रादेशिक उप विभाग<br>७. सहाय्यक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संबंधित प्रादेशिक विभाग - सदस्य सचिव | रु.३.५० कोटी ते रु.५.०० कोटी पर्यंत |

०२. रु.५.०० कोटींवरील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या तांत्रिक छाननीकरीता संदर्भिय क्र.४ दि.२२.०९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयात नमुद समिती सक्षम असेल.

सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०११२११५१४०७९२८असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saroj Rajesh Deshpande

Digitally signed by Saroj Rajesh Deshpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a31a46110f5bc3d6fc7bdf1d6619a227d04e20859a66b7faddf9190ac096802, cn=Saroj Rajesh Deshpande
Date: 2022.01.19 11:08:34 +05'30'

**(सरोज देशपांडे)**
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. विभागीय आयुक्त, कोकण विभाग/ औरंगाबाद विभाग/ पुणे विभाग/नाशिक विभाग/ अमरावती विभाग/नागपूर विभाग
५. मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
७. आयुक्त, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व).
९. प्रकल्प संचालक,राज्य पाणी व स्वच्छता मिशन, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१०. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
११. प्रादेशिक उप संचालक (सर्व), भूजल व विकास यंत्रणा.
१२. अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१२.कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु., जि.प. व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व).
१४.पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
१५.निवडनस्ती (कार्यासन पापु-१०), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

**जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या तांत्रिक/ प्रशासकीय/ अंमलबजावणी अधिकारांमध्ये सुधारणा करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्रमांकः जजीमि २०१९/प्र.क्र. १३८/पापु १०**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीखः २५ फेब्रुवारी, २०२२

वाचा-

१. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. आपना -१०११/ प्र.क्र.८७/ पापु १५, दि.१३.०४.२०११**
२. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि २०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १० (०७), दि.०४.०९.२०२०**
३. **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि २०१९/ प्र.क्र.१३८ (भाग-२) / पापु १० दि.१०.०३.२०२१**
४. **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जजमि २०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १० (०७ दि.२२.०९.२०२१**

प्रस्तावना-

राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरीता संदर्भ क्र.२ दि.०४.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या तांत्रिक / प्रशासकीय /अंमलबजावणीचे अधिकार संदर्भिय क्र.३ दि.१०.०३.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले आहेत.

जल जीवन मिशनच्या प्रगतीसाठी, क्षेत्रीय स्तरावरील अधिकारांमध्ये सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. यास अनुसरून, संदर्भिय क्र.३ दि.१०.०३.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या तांत्रिक/

प्रशासकीय/अंमलबजावणीचे अधिकारांमध्ये सुधारणा तसेच जल जीवन मिशन अंतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेस अधिकार उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन शुध्दिपत्रक-**

जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या तांत्रिक/ प्रशासकीय/अंमलबजावणीचे अधिकार संदर्भिय क्र.३ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहे.

०२. जल जीवन मिशनच्या प्रगतीसाठी, रू.२.०० कोटी ते रू.५.०० कोटी पर्यंत किंमतीच्या स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्विकृतीचे अधिकार व अंमलबजावणीचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणालाही राहतील. तथापि, स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला हस्तांतरीत करण्याचे अधिकार पुढीलप्रमाणे असतील.

i) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन - संबंधित जिल्हा परिषदेच्या ठरावानुसार

ii) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग - संबंधित जिल्हा परिषदेचा ठराव नसल्यास

०३. जल जीवन मिशन मधील स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेंतर्गत स्त्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना व दुहेरी पंपावर आधारित नळ पाणी पुरवठा योजनांच्या (पारंपारिक व अपारंपारिक उर्जेवर आधारीत) अंमलबाजवणीचे अधिकार भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेला देण्यात येत आहेत. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत अंमलबजावणी करण्यात येणा-या उपाययोजनांची निवड जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनमार्फत करण्यात येईल. अशा उपाययोजनांच्या रु.५०.०० लक्ष मर्यादेपर्यंतचे तांत्रिक मान्यतेचे अधिकार शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग . क्र. आपना - १०११/ प्र.क्र.८७/ पापु १५,दि.१३.०४.२०११ नुसार राहतील.

सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०२२३१०५०४९४९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANUSHKA ANIRUDH DALVI

Digitally signed by ANUSHKA ANIRUDH DALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5edd45c6e1357ae0c8533741733e53bdac703b68fe52733dbcffe2914e0ac003, pseudonym=788F41926BA617FC3320DC8952A519D487C674CD, serialNumber=73F1FB9D6CBC3DAFBAD56FB8AD850EDE51730924E3CF0C7CD07F0DACC65316C5, cn=ANUSHKA ANIRUDH DALVI
Date: 2022.02.25 15:28:27 +05'30'

(अनुष्का दळवी)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रत-**

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. मिशन संचालक, जल जीवन मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन), बेलापूर, नवी मुंबई.
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
६. आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
९. उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. कार्यकारी अभियंता / उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
११. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद (सर्व)
१२. निवडनस्ती -कार्यासन- पापु १०

## –: नोंद :–